महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**पीरबाजार, उसानपरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.: विकाऔ/आस्था-३/२०२०/ ९०५ दिनांक : 19 MAR 2020

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जितूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड,
पु.ला.शा.तं.लातूर,नि.म.तं.लातूर

**विषयः-** कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.

**संदर्भः-** १.शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व.का) मुंबई, दि.१८ मार्च, २०२०
२.मा.संचालक, तंत्रशिक्षण म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.४/आस्था/समय/२०२०/१९८, दि.१९/०३/२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागातील अधिनस्त सर्व संस्था/कार्यालय यांना सुचित करण्यात येते की, कोरोना विषाणूचा प्रसार राज्यातील कार्यालयामध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निर्देश केल्याप्रमाणे आपल्या संस्था /कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आळीपाळीने कार्यालयात हजर राहणेबाबत आपले स्तरावरून सुचित करण्यात यावे.

संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करून आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचारी यांना निर्देशित करण्यात यावे व आपल्या संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांची संख्या ५० टक्के राहील याची दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव देऊन सादर करण्यात येते की, या कार्यालयामधील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात आली असून सदर बाबतीत शासन निर्णयानुसार अमलबंजावणी करण्यात येत आहे.